नेमबाजांचे पदकसातत्य

रायफल सांघिक रौप्यमध्ये महाराष्ट्राच्या रुद्रांक्ष, पार्थचे योगदान

वृत्तसंस्था, नागोया

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी आपले 'पदक'सातत्य सलग दुसऱ्या दिवशी कायम राखले. युवा हिमांशु धिल्लों आणि 'लोकसत्ता तरुण तेजांकित' पुरस्कार विजेता ठाण्याचा रुद्रांक्ष पाटील यांनी पुरुषांच्या १० मीटर एअर रायफलच्या वैयक्तिक प्रकारात अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक पटकावले. त्याच बरोबर या दोघांनी सोलापूरच्या १८ वर्षीय पार्थ मानेच्या साथीत भारताला सांघिक प्रकारातही रौप्यपदक मिळवून दिले.

या तीन पदकांमुळे भारताची नेमबाजीतील एकूण पदकसंख्या पाच (चार रौप्य आणि एक कांस्य) झाली आहे. मात्र, पॅरिस ऑलिम्पिकमधील दुहेरी सुवर्णपदक विजेता चीनचा शेंग लिहाओ याचे आव्हान कोणालाही पार करता आले नाही. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या शेंगने पुन्हा एकदा वर्चस्व गाजवत सुवर्णपदक पटकावले. त्याने २५४.२ गुणांसह नवा आशियाई, तसेच स्पर्धाविक्रम नोंदवला. आपला २१वा वाढदिवस साजरा करणाऱ्या हिमांशूने २५२.४ गुणांसह रौप्यपदक जिंकले, तर सुरुवातीला अव्वल स्थानासाठी आव्हान देणारा रुद्रांक्ष अखेरीस २३०.९ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिला. वैयक्तिक पदकांच्या अवव्या एक तास आधी हिमांशु, माजी जागतिक विजेता रुद्रांक्ष आणि पार्थ या त्रिकुटाने सांघिक प्रकारात रौप्यपदक मिळवले होते. या प्रकारातही चीनने नवा मापदंड प्रस्थापित केला. शेंग लिहाओ, चांगहाँग झँग आणि सिहान मा यांनी एकत्रित १८९९.० गुण मिळवून रौप्य वर्षी केरी येथे नोंदवलेला आपलाच १८९८.४ गुणांचा जागतिक विक्रम मोडीत काढला. भारताने १८९०.१ गुणांसह रौप्य, तर दक्षिण कोरियाने १८८४.२ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

डावीकडून रुद्रांक्ष पाटील, हिमांशू धिल्लों आणि पार्थ माने.

भारतीयांमध्ये चुरस

वैयक्तिक अंतिम फेरीत वीनवा शेंग लिहाओ सातव्याने आघाडीवर असताना हिमांशू आणि रुद्रांक्ष यांच्यात रौप्य व कांस्यपदकासाठी अटीतटीची लढत पाहायला मिळाली. सुरुवातीला २०१२चा जागतिक विजेता रुद्रांक्षने शेंगला आव्हान दिले. मात्र, निर्णायक टप्प्यात चित्र पालटले. एकूण २४ फैऱ्यांच्या अंतिम फेरीतील २२व्या प्रयत्नातमध्ये रुद्रांक्षला केवळ ९.७ गुणांचा वेध घेता आला, तर हिमांशूने ९०.६ गुणांच्या अचूक कामगिरीसह दुसरे स्थान पटकावले.

सांघिक खेळांत भारताची भक्कम वाटचाल

वृत्तसंस्था, तोकाई सिटी

आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी, बॅडमिंटन आणि हॉकी या सांघिक खेळांमध्ये भारतीय संघांनी पदकाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. कबड्डीत पुरुष आणि महिला संघांनी विजयी सलामी दिली. बॅडमिंटनमध्ये पुरुष संघाने उपांत्यपूर्व फेरी गाठली, तर हॉकीमध्ये महिला संघाने गोलधडाका कायम ठेवला.

कबड्डीत दमदार विजय

गेल्या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या भारतीय पुरुष आणि महिला संघांनी दमदार प्रारंभ केला. पुरुष संघाने यजमान जपानचा ४९-२४ असा पराभव केला, तर महिला संघाने बांगलादेशवर ४२-२१ अशी मात केली. पुरुषांच्या सामन्यात भारताने मध्यंतरापर्यंत ३१-९ अशी भक्कम आघाडी घेतली होती. उत्तराधांत गतविजेत्या भारताने आणखी १८ गुणांची कमाई केली.

हॉकीत महिलांचा दबदबा

भारतीय महिला हॉकी संघाने दुसऱ्या सामन्यातही गोलधडाका कायम राखला. पहिल्या दिवशी १९ गोलचा पाऊस पाडल्यानंतर भारताने दुसऱ्या सामन्यात इंडोनेशियाचा १७-१ असा पराभव केला. दीपिका सेहरावत, महाराष्ट्राची ऋतुजा पिसाळ आणि नवनीत कौर या तिघींनी शानदार हॅट्ट्रिक नोंदवली. याशिवाय सुनेलिता टोप्पो, लालरेमसियामी आणि साक्षी राणा यांनी प्रत्येकी दोन गोल केले. कर्णधार सलिमा टेटे आणि इशिका चौधरी यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला. भारताचा पुढील सामना बुधवारी थायलंडविरुद्ध होणार आहे.

जलतरणात निराशा कायम

जलतरणात केवळ श्रीहरी नटराज अंतिम फेरीत पोहोचला. मात्र, ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात त्याला दहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले. दोन वेळचा ऑलिम्पिकपटू असलेल्या २५ वर्षीय श्रीहरीने अंतिम फेरीत २५.५२ सेकंदांची वेळ नोंदवली. अंतिम फेरीतील त्याची ही वेळ सकाळच्या पात्रता फेरीत नोंदवलेल्या २५.३७ सेकंदांपेक्षाही खराब होती. अन्य शर्वातीत थ्रबध दास ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात २५.४१ सेकंदांसह अकराव्या स्थानावर राहिला. आकाश भणी (२३.४३ सेकंद) आणि गीतेश शहा (२३.५७ सेकंद) पुरुषांच्या ५० मीटर फ्री-स्टाईल प्रकारात अनुक्रमे २६व्या आणि २८व्या स्थानावर राहिले.

बॉक्सिंगमध्ये सुमितची आगेकूच

भारताच्या बॉक्सिंग मोहिमेची धडाकेबाज सुरुवात झाली आहे. सुमित कुंडूने ७० किलो वजनी गाटाच्या पहिल्या फेरीत थायलंडच्या बुंजॉन्ग सिन्सिरीचा ५-० असा पराभव केला. यासह त्याने उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

बॅडमिंटनमध्ये उपांत्यपूर्व फेरीत

भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाने बांगलादेशवा ३-० असा एकतर्फी पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. लक्ष्य सेन, आयुष शेट्टी आणि किदाम्बी



श्रीकांत यांनी एकही गेम न गमावता हा दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारताने मंगळवारी यजमान जपानविरुद्ध होणाऱ्या उपांत्यपूर्व लढतीत आपले स्थान पक्के केले आहे. विशेष म्हणजे, भारताचा महिला संघदेखील उपांत्यपूर्व फेरीत जपानचाच सामना करणार आहे. लक्ष्यने इब्न एमन जमनचा अवघा अर्ध्या तासात २१-४, २१-१२ असा, आयुष शेट्टीने गौरव सिंहचा २१-४, २१-१३ असा, तर किदाम्बी श्रीकांतने झुआर अल अमीनचा २३-१५, २१-९ असा पराभव केला.

सुचिकाची 'सुवर्ण'संधी हुकली!

मिक्स्ड मार्शल आर्ट्स प्रकारात कांस्यपदकावर समाधान

वृत्तसंस्था, नागोया

आशियाई क्रीडा स्पर्धेत प्रथमच समाविष्ट करण्यात आलेल्या मिक्स्ड मार्शल आर्ट्स (एमएमए) प्रकारात भारताच्या सुचिका तरियालने ऐंतिहासिक कांस्यपदकाची कमाई केली. मात्र, त्याहीपेक्षा उपांत्य फेरीत नियमित लढत बरोबरीत सुटल्यानंतरही तिला प्रतिस्पर्धीपेक्षा अधिक वजनामुळे पराभूत घोषित करण्यात आले आणि हाच अधिक चर्चेचा विषय ठरला.

महिलांच्या पारंपरिक ६० किलो वजनी गटातील उपांत्य फेरीत सुचिकाची सिंगापूरच्या हुई हून तेओविरुद्धची लढत निर्धारित वेळ फेऱ्यांनंतर बरोबरीत राहिली.

सुचिकाने प्रतिस्पर्धीपेक्षा अधिक दर्जेदार खेळ केल्याचे वाटल्याने भारतीय संघाने निकालाला आव्हान दिले. त्यामुळे नव्याने गुणांकन करण्यात आले. परंतु त्यातही सामना बरोबरीतच राहिला. आंतरराष्ट्रीय मिक्स्ड मार्शल आर्ट्स महासंघाच्या नियमानुसार, अशा परिस्थितीत सकाळी वजनकाट्यावर (वेट-इन) कमी वजन असलेल्या खेळाडूला विजयी घोषित केले जाते. यात तेओने वजन सुचिकापेक्षा ७०० ग्रॅम कमी असल्याने लिला अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला, तर सुचिकाला सुवर्णपदकासाठी खेळताही आले नाही.

सकाळी वजन करताना, सुचिकाचे ५९.२ किलो, तर तेओचे ५८.५ किलो वजन होते. भारतीय संघाने निकालाविरोधात एक हजार अमेरिकन डॉलर शुल्क भरून मध्यस्थीची मागणी केली होती. नव्या तीन पंचांनीही सामना बरोबरीत असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर सिंगापूरच्या संघासमोर पुन्हा गुणांकन करून घेणे किंवा वजनाच्या आधारे निर्णय स्वीकारणे, असे दोन पर्याय होते. त्यांनी वजनाचा निकष स्वीकारला.

भारतीय महिला संघाच्या मार्गात श्रीलंकेचा अडथळा

निशिन (जपान) : गेल्याच आठवड्यात आशिया चषकाचे जेतेपद पटकावणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघासमोर आता वर्चस्व सिद्ध करण्याची आणखी एक संधी आहे. गतविजेत्या भारतीय संघाने प्रतिष्ठेच्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही अंतिम फेरी गाठली असून त्यांच्यासमोर श्रीलंकेचे आव्हान असेल. विशेष म्हणजे, गेल्या रविवारी भारतीय संघाने याच प्रतिस्पर्ध्यांला नमवत आशिया चषक पटकावला होता. आता सुवर्णपदक पटकावण्याचे हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाचे लक्ष्य असेल.

- **वेळ :** सकाळी ९०.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** सोनी टेन १, ३, सोनी लिव्ह ॲप.

बँक ऑफ इंडिया

नाव बँकिंग पलिकडचे

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,शुमती पॅलेस, महावीर उद्यान समोर रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vldarbha@bankofindia.bank.in

सरफेसी अॅक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सदर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

(मालमत्तेच्या तपासणीसाठी विनंती ard.vldarbha@bankofindia.bank.in या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री स्वप्नील अग्रवाल मो. 8888334383, श्री शुभम मस्के मो. 8237771144 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)

दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषतः खालील कर्जदारांना /सह-कर्जदारांना /जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा **सांकेतिक आणि भौतिक** ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ : 25/10/2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत

अ. क्र.	कर्जदार, सह-कर्जदार, प्रोपायटर गहाणदार, जमानतदाराचे नांव, शाखेचे नाव, मालमत्ता आयडी	संपत्तीचे विवरण	एकूण थकबाकी	ताबा प्रकार	नवीन लिलावाची सुरुवातीची किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.
1)	कर्जदार : मे.के.जी.एन. मिनरल्स प्रो.श्रीमती फेमिदा बशिरुद्दीन खान (भागीदार/गहाणदार) श्री समेरुद्दीन खान बशिर खान (जमानतदार) श्री फैजुद्दुद्दीन खान बशिर खान (जमानतदार) शाखा : वणी प्रापर्टी आयडी : BKIDWANI001	श्रीमती फेमिदा बशिरुद्दीन खान यांच्या नावाने असलेल्या जागेचा सर्व भाग आणि तुकडा आणि बिल्डींग, स्ट्रक्चर्स, शेडस, फिक्चर्स उभारलेले आणि बसविलेले प्लॉट नं.35, सर्व्हे नं.50/3, महाकाली नगर जवळ, मौजा वणी, अंदाजे एरिया 195 स्क्वे.मि., तह. वणी, जि.यवतमाळ.	रू. 10.89 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून पुढीलाय + इतर आनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 10,33,000/-	रु. 1,03,300/-
1)	कर्जदार : मे.प्रगती मिनरल्स प्रो.स्व.श्री बशिरुद्दीन सिराहुद्दीन खान (भागीदार/गहाणदार) त्यांचे कायदेशीर वारसदार श्रीमती फेमिदा बशिरुद्दीन खान श्री फैजुद्दुद्दीन बशिरुद्दीन खान शाखा : वणी प्रापर्टी आयडी : BKIDWANI002	स्व.श्री बशिरुद्दीन खान (कर्जदार/गहाणदार) यांच्या नावाने असलेल्या जागेचा सर्व भाग आणि तुकडा आणि बिल्डींग, स्ट्रक्चर्स, शेडस, फिक्चर्स उभारलेले आणि बसविलेले खुला प्लॉट नं.102 (गट नं.102/02) गाव सर्व्हे नं.313,मौजा पाजुरा,तह.वणी,जि.यवतमाळ, अंदाजे एरिया 1.39 हेक्टर आर.	रू. 18.07 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून पुढीआय + इतर आनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 40,61,000/-	रु. 4,06,100/-

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव **"जे आहे जेथे आहे, आणि "जे काही आहे ते आहे आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे"** तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.
2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करुन घेण्यासाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
   a) ई-लिलाव सेवा पुरवठा दाराच्या वेबसाईटचा पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील ऑपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
   टप्पा - 1 : बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
   टप्पा - 2 : केवायसी पडताळणी - बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
   टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
   टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल: इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.
3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील ऋणभार, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देणी /मालमत्तेला होणारी बाधा हयाची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रविष्ट होणे म्हणजे कुणाविही दचनबध्दता असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सध्याच्या आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. वेळेवर आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : 09/10/2026 **रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत** असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करून पूर्वपरवानगी घेण्यात यावी.
5) बोली बेकव ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात यायात.
6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.
7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.
8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परताव करण्यात येईल.
9) बँकांच्या प्रतिकात्मक तत्वात असलेल्या मालमत्तेच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी तर्फे /जिल्हा न्यायालया तर्फे भौतिक ताबा मिळाल्यानंतरच मालमत्तेचा भौतिक ताबा यशस्वी बोलीदाराला सुपुर्द केला जाईल.
10) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) देवीवर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून तावडतोब व्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यासं अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.
11) देवासाईटवरील लिलावाच्या सहभाग आणि बोली लावणे हे असमे नमिले जाईल की बोली लावणा-याने लिलावासंबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.
12) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/बीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहित. असे प्रसंग होऊ नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असावे आणि योग्य असा पॉवर बॅकअप त्यांच्याकडे असावा.
13) यशस्वी बोलीदारांच्या द्वारे निश्चित झालेल्या विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा 1961 च्या कलम 194-I ए च्या अंतर्गत आणि टीडीएस च्या भरणा, बोली रकमेच्या उर्वरित 75% दरके रकमेचा भरणा करताना करणे गरजेचे आहे. यशस्वी खरेदीदाराला लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगित शुल्क, सेवेकानिक शुल्क आणि असंवैधानिक शुल्क वेगवेगळे देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.
14) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी/बँकेकडे असेल. उपरोक्त परिस्थिच्यात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार आणि याबाबीत कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.
15) विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदारांच्या/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.
16) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस अॅन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.
17) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रदद केली जाणार नाही. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिनेच केल्या आहेत असे मानले जाईल.
18) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

कर्जदार/जामीनदारांना विक्री सुचना

ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2) अंतर्गत कर्जदार/जामीनदारांना (एल/आर.एस.) हयांनी सदर सूचना त्यांना देण्यात आलेली 30 दिवसांचि वैधाधिक विक्री सूचना म्हणून समजण्यात यावी.

मानमीय महोदय/महोदया,

निम स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बँकेद्वारे देण्यात आलेल्या कर्जाच्या संदर्भात थकीत देणी आणि व्याजासह मासिक दंड, शुल्क आणि भार यांचे भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुम्ह्यावर उपरोक्त नमूद रकमेचा भरणा 60 दिवसांमध्ये करण्याकरी कलम 13(2) (अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करु शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) (च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुम्ह्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, नागणी सूचना, ताबा घेणे, मालमत्तेचे मुल्यांकन आणि विक्री यासाठी झालेला सर्व खर्च प्राधिकृत अधिका-याकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुम्ह्या लागू असणा-या देण्यांसाठी पाचरण्यात येईल. अटी आणि शर्ती वावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक त्या बयाणा) ईएमडी (रकमेचा भरणा करुन सहभागी हौऊ शकता.

ठिकाण : वर्धा
दिनांक : 21/09/2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राहय मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

ऐन सणासुदीत कर्ज-हप्त्यांचा भार वाढणार?

ऑक्टोबरपासून व्याजदर वाढ सुरू होण्याचे विश्लेषकांचे कयास

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: आंतरराष्ट्रीय स्तरावर खनिज तेलाच्या तापलेल्या किमती आणि त्याचे अर्थव्यवस्थेवरील अनेकांगी परिणामांवर नियंत्रण म्हणून ऑक्टोबरच्या सुरुवातीला होत असलेल्या पतधोरण बैठकीत रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर वाढीचे चक्र सुरू केले जाईल, असा तज्ज्ञांचा होरा आहे. चालू आर्थिक वर्षात किमान अर्धा ते कमाल एक टक्क्यांपर्यंत व्याजदर वाढ केली जाण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली आहे.

देशातील इंधनाची गरज भागवण्यासाठी जवळपास ८५ टक्क्यांच्या घरात खनिज तेलाची भारताकडून आयात होते. मात्र तेलाच्या किमती चढ्या राहिल्यास आणि महागाईचा तान वाढल्यास, रिझर्व्ह बँक ऑक्टोबरमध्येच

व्याजदरात वाढ सुरू करू शकते. चालू आर्थिक वर्षात एकूण ७५ ते १०० आधार बिंदूंची (०.७५ टक्के ते १ टक्का) वाढ होण्याचा अंदाज मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेसने वर्तवला आहे. तर कोटक सिक्युरिटीजचे कमोडिटी आणि चलन व्यवहारांचे प्रमुख अनिंद्य बॅनर्जी यांचा दोन टप्प्यांत अर्धा टक्क्यांच्या दरवाढीचा सयास आहे. त्यांच्या मते पहिली वाढ ही ऑक्टोबरमध्येच होऊ शकते. तथापि रिझर्व्ह बँकेने सणासुदीच्या काळात व्याजदर वाढवल्यास ग्राहकांवरील कर्जाच्या मासिक हप्त्यांचा (ईएमआय) बोजा वाढू शकतो आणि मागणीसारी महत्त्वाच्या असलेल्या या काळात याचा ग्राहकांच्या खर्चावर होणारा परिणाम हा एकंदर अर्थव्यवस्थेसाठी चिंताजनक ठरेल. कंपन्यांच्या कर्ज उभारणीवरही यातून विपरित परिणाम होऊ शकतो, असे मत पिरामल समूहाचे मुख्य अर्थतज्ज्ञ देविका चौधरी यांनी व्यक्त केला.

किरकोळ महागाई ६ टक्क्यांपुढे

तेलाचे दर जितका जास्त काळ १०० डॉलरच्या वर - किंवाहुना ९० डॉलरच्या वरही - राहतील, तितका त्याचा अर्थव्यवस्थेवर अनेक टप्प्यांवर परिणाम दिसू लागेल, असे कोटकचे बॅनर्जी म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, हा एका प्रकारे कुटुंबांवर लादलेला करासारखेच काम करेल. ज्याचा भारताच्या समष्टी आर्थिक स्थैर्यावर मोठा धोका दिसून येतो. पुढील तिमाहीत किरकोळ महागाई ५.८ ते ६.० टक्क्यांच्या दरम्यान जाण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली. मोतीलाल ओसवालच्या अहवालाचेही निरीक्षण आहे की, अन्न व ऊर्जेच्या दरवाढीचे चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत किरकोळ महागाई ६ टक्क्यांच्या वर जाऊ शकते.

येत्या १२ महिन्यांत तेलाच्या किमती नरमतील, असाही अंदाज बॅनर्जी यांनी वर्तवला आहे. पण तोवर चालू खात्यावरील तूट विद्यमान आर्थिक वर्षात वाढून सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपीच्या १.८ ते २.० टक्क्यांवर जाऊ शकते, जी मागील आर्थिक वर्षात ०.५ ते ०.६ टक्के होती. रिझर्व्ह बँकेच्या सक्रिय हस्तक्षेपातून रुपया प्रति डॉलर ९५.७० ते ९६.५० च्या दरम्यान स्थिर राहील, अशी त्यांना अपेक्षा आहे.

'सेन्सेक्स'मध्ये ५६४ अंशांची तेजी

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: खनिज तेलाच्या किमतीत झालेली घट, परकीय गुंतवणूकीचा नव्याने ओघ आणि जागतिक बाजारातील सकारात्मक वातावरणामुळे सोमवारी भांडवली बाजारात सेन्सेक्सची ५६४ अंशांची जोरदार उसळी, तर निफ्टी सलग चौथ्या सत्रात तेजीत बंद झाला.

आठवड्यापासून जास्त काळ सुरू राहिलेल्या मरगळीला सप्ताहारंभी झटकत, सेन्सेक्स ५६४.०३ अंशांनी (०.७६ टक्के) वाढून ७४,८५८.९९ वर स्थिरावला. दिवसभरात त्याने ६९२.४४ अंशांनी म्हणजेच जवळपास एक टक्क्यांच्या मुसंडीसह ७४,९८७.४० या उच्चांकाला गाठले होते. तथापि ७५ हजारांपुढे मजल मारणे त्याच्यासाठी अवघड ठरले. दुसरीकडे सलग चौथ्या दिवशी वधारत, निफ्टीने ६७.९० अंशांची कमाई केली आणि दिवसअखेर तो २३,४१४.३० वर बंद झाला.

जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांच्या मते, आगामी अमेरिका-चीन चर्चेपूर्वी भावना सुधारणे, बरोबरीने अमेरिका-इरण यांच्यातील राजनैतिक कराराच्या नूतनीकरणाच्या आशा आणि तेलाच्या किमती तसेच रोखे उत्पन्नातील घसरण यामुळे गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला. उर्जेच्या किमतीची चिंता चिंता देखील कमी झाली आहे. जागतिक तेल किमतीचा मानदंड असलेल्या 'ब्रेंट क्रूड'चे दर २.३६ टक्क्यांनी घसरून पिंपामागे १०१.४ डॉलरवर आले.

ऊर्जेच्या किमती कमी झाल्यामुळे भारताचे आयात बिल, महागाईचा हष्टीकोन आणि कंपन्यांच्या नफ्यावरील ताण काहीसा हलका झाला आहे. त्यामुळे गेले काही दिवसांत भाव पडलेल्या समभागांची गुंतवणूकदारांकडून खरेदी झाली. सेन्सेक्समधील अल्ट्राटेक सिमेंटने ४.११ टक्क्यांनी उसळी घेतली. शेवटच्या दिवस होता. उल्लेखनीय म्हणजे 'एनएसई'च्या आयपीओचे आकारमानच इतके मोठे होते की, तब्बल ३८.५ लाख